दिनांक :    .०१.२०१९

प्रति,

माननीय पंतप्रधान,
भारत सरकार, १५२ बी, साऊथ ब्लॉक,
रायसिना हिल, नवी देहली – ११००११

**विषय : केंद्र सरकारने कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीरामजन्मभूमी (अयोध्या) येथे राममंदिर बांधण्यासाठी संसदेत त्वरित कायदा करण्याविषयी....**

महोदय,

भगवान श्रीराम हे कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान आहे. उत्तरप्रदेशमधील अयोध्यानगरी ही प्रभू श्रीरामाची जन्मभूमी असल्याचे पुराव्यानिशी सर्वदृष्ट्या सिद्ध झाले आहे. ३० सप्टेंबर २०१० या दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयानेही 'सदर स्थळ रामजन्मभूमी आहे आणि इथे राममंदिर होते', असा निर्णय देऊन 'ती श्रीरामजन्मभूमीच आहे', यावर शिक्कामोर्तब झाले आहे. सध्या या संदर्भातील खटला सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असून तो प्रलंबित आहे; मात्र उच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यात पुराव्यांच्या आधारे अयोध्येतील भूमी ही श्रीरामजन्मभूमी असल्याचे सिद्ध झाले आहे. श्रीराम मंदिर हा देशातील कोट्यवधी हिंदूंच्या आस्थेचा विषय असल्याने हिंदूंच्या भावना लक्षात घेता केंद्र शासनाने कोणत्याही प्रकारचा विलंब न करता संसदेत कायदा करून राममंदिर बांधण्याचा मार्ग मोकळा करावा. त्याचप्रकारे या पवित्र भूमीवर अद्याप हिंदूंना पूजा करण्यास अनुमती नाही. हिंदूबहुल भारतात प्रभू श्रीरामजन्मभूमीवर हिंदूंना पूजा करण्याचा अधिकार नाकारला जाणे, हिंदूंसाठी याहून मोठे दुर्दैव ते काय ! तरी हिंदूंना या ठिकाणी पूजा करण्यासाठी तत्काळ कायमस्वरूपी विशेष अनुमती देण्यात यावी.

*** या संदर्भात आम्ही काही बाबी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की,**

१. ३० सप्टेंबर २०१० या दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाने 'सुन्नी वक्फ बोर्डा'चा दावा फेटाळून लावत त्या जागी 'श्रीरामलला विराजमान आहेत', असे सांगितले. ही भूमी श्रीरामजन्मभूमी आहे आणि मंदिर तोडून विवादास्पद वास्तू उभारण्यात आली होती, हेही मान्य केले.

२. राममंदिर निर्मितीच्या कार्यासाठी वर्ष १८५७ पासून ते आजपर्यंत अनेक हिंदूंनी बलिदान दिले आहे. यामध्ये वर्ष १९९२ मध्ये झालेल्या कारसेवकांच्या आंदोलनाचा विशेष उल्लेख करावा लागेल.

३. 'अयोध्येत राममंदिर उभारणे' ही घोषणा आजवर भाजपच्या जाहीरनाम्यात केंद्रस्थानी राहिली आहे. राममंदिर व्हावे, ही कोट्यवधी हिंदूंची केवळ मागणीच नाही, तर तो हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे.

४. काँग्रेसच्या कार्यकाळात श्री सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार होऊ शकतो, तर विकास आणि हिंदुत्व या सूत्रांवर निवडून येणाऱ्या भाजपला राममंदिर उभारणे निश्चितच शक्य आहे.

५. तमिळनाडूमध्ये 'जल्लिकट्टू' या पारंपरिक खेळावर जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली होती, तेव्हा तेथील तत्कालीन जयललिता सरकारने दबाव आणल्यानंतर केंद्राने त्यांना संबंधित कायदाच पालटायला सांगितला होता. ज्या कायद्याच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने 'जल्लिकट्टू'वर बंदी घातली, त्यातच पालट झाल्यामुळे आपोआप निर्णय फिरला. भाजप शासनाने अ‍ॅट्रोसिटी कायद्याच्या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा आदेश संसदेत कायदा करून बदलला, तसेच तीन तलाकच्या संदर्भात अध्यादेश काढून कायदा केला. इतके सगळे जर होऊ शकते, तर वर्ष २०१४ मध्ये ज्या भाजप शासनाला हिंदू जनतेने पूर्ण बहुमताचा जनादेश देऊन सत्ताप्राप्ती करून दिली, ते भाजप शासन राममंदिरासाठी अध्यादेश का काढत नाही ?

६. आजपर्यंतच्या भारतीय न्यायव्यवस्थेचा अनुभव पहाता सर्वोच्च न्यायालयात याविषयी सुनावणी चालू होणे, शीघ्रतेने या प्रकरणी निकाल येणे आदी गोष्टी होण्यासाठी किती काळ जाईल, हे सांगणे अनिश्चितच आहे. गेल्या ७० वर्षांत जे होऊ शकले नाही, ते आता भाजप शासन सत्तेत असतांना होईल, अशी भोळी आशा घेऊन हिंदु समाज भाजप शासनाकडे आस लावून बसला आहे. जर या शासनाकडूनही मंदिर निर्माणासाठी काही कृती झाली नाही, तर समाजाचा केंद्र शासन आणि

न्याय व्यवस्था यांच्यावरील विश्‍वास उडून जाईल. आणखी किती काळ हिंदूंनी न्यायालयाच्या निकालाची वाट पहायची ? राज्यात, केंद्रात बहुमत असतांना सरकारने राममंदिराविषयी इच्छाशक्ती दाखवायला हवी.

७. गेल्या काही दिवसांपासून देशभरातील विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि संत समाज एकत्रित येऊन 'राममंदिर लवकरात लवकर निर्माण व्हावे आणि त्यासाठी केंद्र सरकारने अध्यादेश काढावा', या मागणीसाठी देशातील विविध राज्यांमध्ये जाहीर सभा घेत आहेत, आंदोलने करत आहेत, निवेदने देत आहेत.

तरी येणार्‍या लोकसभा निवडणुका पहाता हिंदूंच्या भावनांचा कडेलोट होण्याच्या अगोदर शासनाने राममंदिराचा अध्यादेश काढण्याचा निर्णय घ्यावा.

**⁕ या संदर्भात आमच्या मागण्या पुढील मागण्या आहेत –**

१. संसदेत हिंदूंनी दिलेल्या बहुमताच्या आधारे श्रीराममंदिर उभारणी संदर्भातील कायदा बनवून त्याच्या आधारे अयोध्येत भव्य राममंदिर उभारण्यास प्रारंभ करावा.

२. सध्या श्रीरामजन्मभूमीवर श्रीरामाची मूर्ती एका कापडी तंबूत ठेवून तिची एकप्रकारे विटंबनाच केली जात आहे. या ठिकाणी भाविकांना कोणत्याही प्रकारे पूजा-अर्चा करता येत नाही. हे टाळण्यासाठी भव्य श्रीराम मंदिर उभारण्यापूर्वी जवळच एक तात्पुरते लहान मंदिर बांधावे, तेथे श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी आणि हिंदूंना विधीवत पूर्जा-अर्चा, धार्मिक विधी करण्यासाठी सोय उपलब्ध करून द्यावी.

३. जोवर वरील मागण्या पूर्ण होत नाहीत, तोवर श्रीरामजन्मभूमीवर श्रीरामाची विधीवत पूजा करण्यास हिंदूंना कायमस्वरूपी विशेष अनुमती द्यावी.

४. सध्या या ठिकाणी असलेल्या श्रीरामाच्या मूर्तीजवळ जाण्यासाठी अनेक 'मेटल डिटेक्टर' असून कोणतीही वस्तू तेथे नेण्यास बंदी आहे. तपासणी पूर्ण करून सर्व प्रकारचे पूजा आणि विधी यांसाठीचे साहित्य नेण्यासाठी अनुमती देण्यात यावी.

या मागणीसाठी .... या दिवशी ...... या वेळी राष्ट्रीय हिंदू आंदोलन करण्यात आले.

आपला विश्‍वासू,

(संपर्क :                    )